# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१

## प्रसिध्दीपत्रक

### शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जुलै - २०१८ निकाल

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक ०२ ते ०६ जुलै - २०१८ रोजी घेण्यात आलेल्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल दिनांक ०६/०९/२०१८ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात आला आहे. सदर निकाल विद्यार्थ्यांना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रकाची ऑनलाईन प्रिंट घेता येईल.

विद्यार्थ्यांची मुळ प्रमाणपत्रे/ गुणपत्रके व निकालाच्या प्रती सर्व जिल्हयांचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद व मुंबईसाठी शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, बालभवन, चर्नी रोड, मुंबई यांचे कार्यालयामार्फत संबंधीत टंकलेखन संस्थांना यशावकाश वितरीत करण्यात येतील. त्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या टंकलेखन संस्थामधून कार्यालयीन वेळेत मिळतील.

गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी परीक्षार्थ्यांनी आपल्या संस्थेतून ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रु. १०० व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रु. ४००/- ऑनलाईन पध्दतीने **BOI** खाते क्रमांक **050010210000034** व **IFSC Code- BKID0000500** दिनांक १६/०९/२०१८ पर्यंत भरावे. याबाबतच्या सविस्तर सूचना स्वतंत्र परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत तसेच परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

### निकालाची संक्षिप्त माहिती

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित | अनुपस्थित | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | राखीव | | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | पूर्व अट पूर्तता न केलेले | अन्य | |
| टंकलेखन | ८७७२९ | ७४९४२ | १२७८७ | ५९९६२ | २७१६७ | ६२ | ५३८ | ८०.०१ % |
| लघुलेखन | १११७४ | ९६२२ | १५५२ | ३६७३ | ६७६० | ६९४ | ४७ | ३८.१७ % |
| एकूण | ९८९०३ | ८४५६४ | १४३३९ | ६३६३५ | ३३९२७ | ७५६ | ५८५ | ७७.२५ % |

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ४११ ००१